**<u>ठळक बातम्या</u>**

- सार्वजनिक शिधावाटपासाठी राज्यांना निधी देणारी सार्थक योजना १६व्या वित्त आयोगाच्या कालावधीत पुढं राबवायला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी
- आसाममधे सामान नागरी कायदा आणणारं विधेयक विधानसभेत मंजूर
- देशाचे पहिले प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांना पुण्यतिथीनिमित्त देशाची आदरांजली
- बिहारमधे झालेल्या मतदारयाद्यांच्या सखोल पुनरिक्षणाच्या वैधतेवर सर्वोच्च न्यायालयाचं शिक्कामोर्तब / महाराष्ट्रात पंढरपूर वारी आणि अतिवृष्टीच्या कालावधीत SIR राबवू नये अशी प्रदेश काँग्रेसची मागणी

**आणि**

- प्रसिद्ध क्रीडा प्रशासक आणि  नेमबाज राजा रणधीर सिंग यांचं निधन

**<><><><><>**

सार्वजनिक शिधावाटपासाठी राज्यांना निधी देणारी सार्थक पीडीएस योजना १६व्या वित्त आयोगाच्या कालावधीत पुढं राबवायला केंद्रीय मंत्रिमंडळानं मंजुरी दिली आहे. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज नवी दिल्लीत मंत्रिमंडळ बैठकीनंतर बातमीदारांना ही माहिती दिली. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्यानं, सार्थक पीडीएस मधे ३ प्रणाली विकसित केल्या आहेत, असं त्यांनी सांगितलं. लाभार्थ्यांची नोंदणी सांभाळण्यासाठी 'निर्मल', तर तक्रारींवर दाद मागण्यासाठी 'आशा' ही बहुभाषक प्रणाली तयार केली आहे. वितरण व्यवस्थेतल्या मालाची वाहतूक करणारे ट्रक किंवा इतर वाहनांची हालचाल,  'सक्षम' या प्रणालीत टिपली जाते. यातील बदलाबाबत वैष्णव यांनी सांगितल…

**होल्ड -बाईट - अश्विनी वैष्णव**

या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी २५ हजार ५३० कोटी रुपयांची तरतूद करण्याचा प्रस्तावही आजच्या बैठकीत मंजूर झाला.

सार्वजनिक वितरण प्रणालीच्या माध्यमातून देशातील प्रत्येक गरजू व्यक्तीपर्यंत अन्नधान्य वेळेवर पोहोचवण्यासाठी सरकार कटिबद्ध असून ही वितरण प्रणाली अधिक आधुनिक आणि प्रभावी बनवण्याचा निर्णय घेण्यात आल्याचं, तसच ग्राहकांच्या तक्रारींचं निवारण जलद गतीनं होण्यास मदत होईल,अशी प्रतिक्रिया प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाज माध्यमावर व्यक्त केली आहे.

<><><><><>

आसाम विधानसभेनं आज सामान नागरी कायदा विधेयकाचा स्वीकार केला असून यामुळे हे विधेयक स्वीकारणारं ते ईशान्येकडचं पहिलं तर देशातलं तिसरं राज्य ठरलं आहे. सोमवारी आसाम विधानसभेच्या पहिल्या सत्रात हे विधेयक मांडण्यात आलं ते आज सत्राच्या अखेरच्या दिवशी संमत झालं. आता ते राज्यपालांकडे पाठवण्यात येईल आणि त्यानंतर ते राष्ट्रपतींकडे पाठवण्यात येईल असं मुख्यमंत्री हेमंत बिस्व  शर्मा यांनी सांगितलं. या नव्या नियमानुसार राज्यातल्या सर्व नागरिकांना विवाह, घटस्फोट, एकपत्नित्व, लिव्ह इन रेलशनशिप आदींबाबत आखून दिलेली चौकट  पाळावी लागेल.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आसामच्या जनतेचं अभिनंदन  केलं आहे.

<><><><><>

कांदा प्रश्नी केंद्र सरकारसोबत सकारात्मक चर्चा झाली असून हमीभावाबद्दल येत्या दहा दिवसांत तोडगा निघेल असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी सांगितलं. केंद्रीय गृहमंत्री आणि सहकार मंत्री अमित शहा  यांच्या उपस्थितीत कांदा प्रश्नासहीत विविध प्रश्नांबाबत आज नवी दिल्लीत बैठक झाली, त्यानंतर मुख्यमंत्री वार्ताहरांशी बोलत होते. कांद्याचे दर स्थिर राहावे याकरता उपाययोजना सुचवल्या आहेत, याबाबत केंद्र सरकार सकारात्मक आहे. नाफेड आणि एन सी सी एफ नं

कांद्याची २ लाखाऐवजी दहा लाख टन खरेदी करणं तसंच अतिरिक्त निर्यात कर लावण्याच्या मागणीबाबतही केंद्र सरकार सकारात्मक आहे, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं…

**होल्ड बाईट मुख्यमंत्री (२१ सेकंद)**

या बैठकीला केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान, केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी तसंच राज्यातून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार, मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, गिरीश महाजन उपस्थित होते.

**<><><><><>**

ईशान्य भारताचा विकास हा देशाच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत आवश्यक असल्याचं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. गंगटोक इथे सिक्कीम विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात आज त्या बोलत होत्या. विद्यार्थ्यांनी आपल्या नवनवीन कल्पना, संशोधन आणि परस्पर विश्वासाच्या जोरावर राष्ट्र उभारणीत योगदान द्यावं, असं आवाहन राष्ट्रपतींनी यावेळी केलं.

या आधी, राष्ट्रपतींनी गंगटोक इथे राज्यपाल आणि मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत 'पिंक सिटी रनर – आमा दिदी बहिनी बस सेवे' ची हिरवा झेंडा दाखवून सुरुवात केली.

**<><><><><>**

देशाचे पहिले प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना आज आदराजंली वाहण्यात येत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशातून नेहरू यांना आदरांजली वाहिली.

नवी दिल्लीत शांतिवन इथं पंडित नेहरूंच्या समाधीस्थळी काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, लोकसभेतले विरोधी पक्ष नेते राहुल गांधी तसंच इतर अनेक

नेत्यांनी पुष्पांजली अर्पित केली. लोकसभेचे सभापती ओम बिरला यांनी देखील प्रथम प्रधानमंत्र्यांना आदरांजली वाहिली आहे.

**<><><><><>**

SIR अर्थात मतदारयाद्यांच्या सखोल पुनरीक्षणाच्या प्रक्रियेच्या वैधतेवर, सर्वोच्च न्यायालयानं आज शिक्कामोर्तब केलं.

गेल्यावर्षी बिहारमधे पुनरीक्षण प्रक्रिया राबवण्यासाठी काढलेल्या अधिसूचनेला आव्हान देणाऱ्या याचिकेवर, आज सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली, त्यावेळी न्यायालयानं हा निर्णय दिला. जन प्रतिनिधीत्व कायदा १९५० च्या कलम ३२४ नुसार निवडणूक आयोगाला पुनरीक्षण प्रक्रिया राबवण्याचा अधिकार आहे, याद्वारे राज्यघटनेच्या मूलभूत तत्त्वाचं पालन होतं, असं न्यायालयानं सांगितलं.

SIR मुळे नागरिकत्व रद्द होतं हा याचिकाकर्त्यांचा दावा न्यायालयानं फेटाळून लावत निवडणूक प्रक्रिया ही यांत्रिक प्रक्रिया नसून मतदारयाद्यांची अचूकता आणि विश्वासार्हतेवर अवलंबून आहे, असं नमूद केलं. तसंच याआधी मतदारयाद्यांचं सखोल पुनरीक्षण चाळीस वर्षांपूर्वी झालं असून या दरम्यान मतदारयाद्यांमधे त्रुटी निर्माण झाल्या आहेत, त्यामुळे पुनरीक्षण प्रक्रियेची गरज आहे, हे निवडणूक आयोगानं दिलेलं कारण न्यायालयानं मान्य केलं.

**<><><><><>**

पंढरपूर वारी आणि अतिवृष्टीच्या कालावधीत SIR, अर्थात मतदार यादी विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम राबवू नका, अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

SIR चा दुसरा टप्पा ३० जून ते २९ जुलै दरम्यान होणार आहे. याच कालावधीमध्ये आषाढी वारी असून राज्यातले लाखो वारकरी त्यात सहभागी होत असल्यानं या काळात ते गावाबाहेर असतील, त्यामुळे त्यांची नावं वगळली

जाण्याची भीती आहे. तसंच जुलै महिन्यात महामुंबई परिसर, कोकण, पुणे, सातारा भागात अतिवृष्टीचा अंदाज हवामान खात्यानं दिला आहे. या सर्वांचा विचार करुन एसआयआर कार्यक्रम महिनाभर पुढे ढकलावा, असं सपकाळ यांनी राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी चोकलिंगम यांना लिहिलेल्या पत्रात केली आहे.

**<><><><><>**

प्रसिद्ध क्रीडा प्रशासक आणि  नेमबाज राजा रणधीर सिंग यांचं आज नवी दिल्लीत वार्धक्यानं निधन झालं. ते ७९ वर्षांचे होते. श्वसनाच्या त्रासामुळे गेले काही दिवस त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरु होते. अर्जुन पुरस्कारानं सन्मानित रणधीर सिंग यांनी १९७८च्या आशियाई क्रीडास्पर्धांमधे सुवर्णपदक मिळवलं होतं. तसंच ऑलिंपिक स्पर्धांमधे भारताचं प्रतिनिधित्व केलं होतं. इंडियन ऑलिंपिक असोसिएशनचे महासचिव म्हणून तर इंटरनॅशनल ऑलिंपिक कमिटीचे सदस्य म्हणून त्यांनी काम केलं होतं. ऑलिंपिक काऊन्सिल ऑफ आशिया या संघटनेचे अध्यक्ष म्हणून २०२४मधे ते निवडून आले होते. मात्र अलिकडेच त्यांनी प्रकृतीच्या कारणास्तव राजीनामा दिला होता.

**//<><><><><>//**